




दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ९७
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१९ नोव्हेंबर २०२४


## माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर जीवघेणा हल्ला !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, नागपूर :** माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते अनिल देशमुख यांच्या वाहनावर सोमवारी रात्री अज्ञात इसमांनी दगडफेक केली. त्यात देशमुख गंभीर जखमी झाले असून त्यांना काटोल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.



नरखेड येथून प्रचारसभा आटोपून काटोलकडे परत जात असताना बेला फाट्यानजिक ही घटना घडली. काटोल मतदार संघात अनिल देशमुख यांचे पूत्र सलील हे राष्ट्रवादीचे उमेदवार आहेत. प्रचाराच्या अखरेच्या दिवशी देशमुख दिवसभर मतदार संघात प्रचारात सक्रीय होते. संध्याकाळी त्यांची नरखेडमध्ये सभा होती. ती आटोपून कार्यकर्त्यांसम वेत ते कारने काटोलकडे निघाले होते. या दरम्यान बेला फाट्याजवळ काही अज्ञात इसमांनी त्यांच्या गाडीवर दगडफ ेक केली. यात अनिल देशमुख हे गंभीर जखमी झाले असून त्यांना काटोलच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. या घटनेची चित्रफित समाजमाध्यमावर प्रसारित झाली असून त्यात देशमुख यांच्या चेहऱ्यावर जखमा दिसून येत आहेत. ट

याच प्रमाणे त्यांच्या वाहनाच्या काचा फुटलेल्या दिसून येतात. या संदर्भात नागपूर ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधला असता त्यांनी घटना घडल्याचे सांगितले. परंतु, अन्य तपशील देण्यास नकार दिला. दरम्यान, या घटनेची माहिती कळताच राष्ट्रवादीचे शेकडो कार्यकर्ते रुग्णालयाजवळ एकत्र झाले होते. त्यामुळे तणाव निर्माण झाला होता. भाजपने ही 'स्टंटबाजी' आहे, असा आरोप केला आहे.

स्वत:च्याच कार्यकर्त्यांकडून देशमुख यांनी दगडफेक घडवून आणली, असा आरोप भाजपचे काटोल मतदार संघाचे प्रभारी अविनाश ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केला आहे. काटोलमध्ये सलील देशमुख यांच्याविरुद्ध भाजपचे चरणसिंह ठाकूर यांच्यात अटीतटीची लढत आहे. मतदानाच्या दोन दिवसांपूर्वी ही घटना घडल्याने राजकीय वर्तूळात खळबळ उडाली. माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि भारतीय जनता पक्ष यांच्यात वाद मागील काही वर्षांपासून सुरु आहे. देशमुख मंत्री असताना त्यांच्यावर झालेले खंडणीचे आरोपाला भाजपची फूस होती, असा आरोप देशमुख यांनी यापूर्वीच केला आहे. या संपूर्ण घटनाक्रमावर त्यांनी एक पुस्तकही काढले आहे. अलीकडे या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या न्या. चांदीवाल यांनी एका मुलाखतीत खंडणी प्रकरणात कोणालाही 'क्लिन चीट' दिली नाही, असा दावा केला होता. त्याचा आधार घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काटोल मतदार संघातील प्रचारसभेत देशमुखांचे पितळ उघडे पडले, अशी टीका केली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेता मतदानापूर्वीच्या घटनेला महत्व आले आहे.

## राज्याचे नेतृत्व बाळासाहेब थोरातांकडे! खा.सुप्रिया सुळेंकडून मुख्यमंत्री पदाबाबत स्पष्ट संकेत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, संगमनेर (अहिल्यानगर) :** संगमनेर तालुक्यातील जनतेच्या मनात जे स्वप्न आहे, ते माझेही स्वप्न आहे. सरकार आल्यानंतर त्यांच्यावर मोठी जबाबदारी पडणार हे नक्की आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे यांनी राज्यातील महाविकास आघाडी सरकारचे नेतृत्व आ.बाळासाहेब थोरात करतील, असे स्पष्ट संकेत साकूरच्या सभेमधून दिले आहेत.



मित्रपक्षातील महत्त्वाच्या नेत्याने हे विधान केल्याने नव्या राजकीय चर्चेला तोंड फुटले आहे. महाविकास आघाडीच्या प्रचाराच्या निमित्ताने काल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खा.सुप्रिया सुळे नगर जिल्हा दौर्यावर होत्या. सायंकाळी उशिरा त्यांची संगमनेर मतदारसंघात साकूर येथे सभा झाली. यावेळी त्यांनी संगमनेरचे सुसंस्कृत राजकारण, आ.थोरात यांचे विधायक नेतृत्व आणि डॉ.जयश्री थोरात यांच्या निमित्ताने आश्वासक भावी राजकीय पिढी यांचा उल्लेख करत मोठे विधान केले. सभेला जमलेल्या गर्दीला उद्देशून त्या म्हणाल्या, आज मी जल्लोषाच्या सभेसाठी आले आहे, ही प्रचाराची सभा नाही. कारण आ.बाळासाहेब थोरात यांचे नेतृत्व उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. तुमच्या मनात जे स्वप्न आहे, ते पूर्ण व्हावे ही माझीही इच्छा आहे. महाराष्ट्राला एका सुसंस्कृत नेतृत्वाची खरच गरज आहे.

महाविकास आघाडीचे सरकार होते, तेव्हा आणि आताही राज्यातील काही मुद्यांवर चर्चा करायची असेल तर ज्येष्ठ नेते शरद पवार साहेब हक्काने आ.बाळासाहेब थोरात यांच्याशी चर्चा करतात आणि कोणताही प्रश्न असो, तो सुटतो. महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर त्यांच्यावर मोठी जबाबदारी पडणार आहे, असे त्या म्हणाल्या. एकप्रकारे त्यांनी मुख्यमंत्री पदाबाबत संकेत दिल्याचे मानले जात आहे.

लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिण मतदारसंघातील खासदार निलेश लंके यांच्या विजयात आ. थोरात यांचा सिंहाचा वाटा होता,असे त्यांनी सांगितले. दरम्यान, डॉ. जयश्री थोरात यांचं भाषण ऐकले, तेव्हा एका सुसंस्कृत पित्याची एक सुसंस्कृत मुलगी कशी असते, हे दिसले,असे त्या म्हणाल्या.

**अजितदादांना टोला...!**

जेव्हा जेव्हा आ. बाळासाहेब थोरातांना भेटते, तेव्हा सुसंस्कृत मोठा भाऊ कसा असावा तर तो आ. थोरातांसारखा असावा, हे जाणवत राहतं, असा स्नेह व्यक्त करत खा. सुप्रिया सुळे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अप्रत्यक्ष टोलाही लगावला.

## २५ वर्ष सत्तेत असूनही शेतीचे पाणी, आरोग्याचे प्रश्न सोडवण्यात विद्यमान आमदार अपयशी

**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** गेली २५ वर्षे हून अधिक काळ एकाच घरात सत्ता असूनही या सत्ताधाऱ्यांना वाई खंडाळा महाबळेश्वर चे शेतीच्या पाण्याचा प्रश्न,आरोग्याच्या सुविधा,उच्च शिक्षणाच्या पायाभूत सुविधा व रोजगाराचा प्रश्न सोडवता आला नाही. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे हा मूलमंत्र अवघ्या महाराष्ट्र दिला.

मात्र वाई चे विद्यमान आमदारांनी मात्र यशवंत विचाराला तिलांजली देत, घरातच सत्तेचे केंद्रीकरण केले आहे. मतदारसंघात हुकूमशाही पद्धतीने कार्यकर्त्यांना व मतदारांना वागवण्याची विद्यमान आमदारांची कार्यपद्धत असून आता मी सक्षम तिसरा पर्याय जनतेसमोर दिला आहे.आपल्या मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मला साथ द्या असे आवाहन अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी खंडाळा येथील सांगता सभेत केले.




**पुरुषोत्तम जाधव यांची खंडाळा येथील सांगता सभेत जोरदार टीका**

यावेळी पुरुषोत्तम जाधव म्हणाले,वाई तालुक्यात दोन दोन धरणे असताना १५ वर्षे संधी दिलेल्या आमदाराच्या निष्क्रियतेमुळे आपल्याच तालुक्याचे हक्काचे पाणी दुसरीकडे गेलेच कसे ? यावेळी आपण काय करीत होता? ते नक्की कुणी पळवल असा यावेळी केला.

पुढे पुरुषोत्तम जाधव म्हणाले,वाई तालुका दुष्काळी जाहीर करावा लागतो हे त्यांचे अपयश आहे पण विशेष प्रयत्नातून वाई तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर करून घेतला म्हणून आनंद साजरा करणारा देशातील पहिला आमदार आपल्या मतदार संघाला लाभला हे मतदार संघाचे सगळ्यात मोठे दुर्दैव आहे.तीन टर्म सत्ता भोगुनही कुचकामी ठरलेल्या आमदारांकडून साडे चार हजार कोटी रुपयांचा निधी आणला म्हणून प्रचार सुरू आहे.

पण मतदार संघातील मूलभूत समस्या त्याच आहेत.दोन दोन धरणे असलेल्या वाई तालुक्यात ५० वर्षे दुष्काळी राहिलेल्या वासोळे ते वेळे पर्यंतच्या ४० गावांना पाणी पोहोचवून पाणीदार केले असते आणि ४० गावे दुष्काळ मुक्त केली म्हणून आनंद साजरा केला असता तर आम्ही सुद्धा नक्कीच कौतुक केले असते.परंतु दुर्दैवाने हे विद्यमान आमदारांना अपयश आहे. खोटं बोल पण रेटून बोल हा फॉर्म्युला यंदा चालणार नाही हाच संदेश मतदार बांधवांनी लाभनायक आमदाराला दिला आहे.

खंडाळा तालुक्याच्या पाणी प्रश्नाचा पुळका आलेल्या विद्यमान आमदारांना गेल्या पंचवीस वर्षात पाणी प्रश्न का सोडवता आला आहे नाही? खंडाळा तालुक्याचा फक्त मतापुरता वापर करणाऱ्या मूकनायक आमदारांना त्यांची जागा दाखवून द्या. वडील १० वर्षे खासदार हे १५ वर्षे आमदार अशी २५ वर्षे सत्ता घरात असूनही यांना वाई तालुक्यातील कवठे केंजळ योजना देखील पूर्ण करता आली नाही.वाई शहराला भेडसावणारा पार्किंग चा प्रश्न सोडवता आला नाही.

ज्या किसनवीर आबांच्या नावाने राजकारण करतायत त्यांचे स्मारक अद्याप धूळखात पडलेय ते सुशोभित करता आले नाही. आणि आता विधानसभा निवडणुकीत यांना खंडाळ्यात ट्रॉमा सेंटर उभे करण्याची आठवण झाली आहे. पाण्याची एक थेंबही तालुक्याबाहेर जाऊ देणार नाही याची आठवण झाली मग १५ वर्षे काय केले? असा थेट सवाल वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभेचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी विद्यमान आमदारांना केला आहे.

## राणी लंके यांच्या पाठीशी महिलांची मोठी ताकद महिलांनीच घेतली पारनेरमध्ये निवडणूक हाती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतर्फे राणी लंके या निवडणूक लढवित आहे. उमेदवारी जाहीर झाल्यापासूनच त्यांनी प्रचार सुरु केलेला आहे. या प्रचारात त्यांना पारनेर व नगर तालुक्यातील महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या आहेत. ही निवडणूक महिलांनी हाती घेतली असून राणी लंके यांना सर्वाधिक मतांनी विजयी करण्याचा निर्धार महिलांनी केलेला आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके निवडणूक लढवित आहेत. लंके यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध कामे तालुक्यात केलेली आहे. या जिल्हा परिषद सदस्य पदाच्या माध्यमातून त्यांचा स्थानिक स्वराज्य संस्थाचा चांगला अभ्यास झालेला आहे. त्यामुळे त्यांना आमदार झाल्यानंतर मतदारसंघाबरोबरच जिल्ह्यातील प्रश्न मांडणे सोपे होणार आहे. लंके आमदार झाल्यानंतर महिलांच्या प्रश्नावर त्या वारंवार वाचा फोडून सरकाराला महिलांना न्याय द्यायला त्या भाग पाडतील, अशीच प्रतिक्रिया मतदारसंघातील महिला व्यक्त करीत आहेत तालुक्यतील पाण्याचा प्रश्न त्या आमदार झाल्यानंतर प्राधान्याने सोडवतील, अशी आशा महिलांना लागलेली आहे. महिलांची अडचण त्या ओळखून नेहमीच महिलांना न्याय देतील, असे मत पारनेर व नगर तालुक्यात व्यक्त केले जात आहे. पारनेर व नगर तालुक्यातील महिलांनी महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांना विजयी करण्याचा निर्धार केलेला आहे. लंके यांना नुसते विजयी करायचे नाही, तर त्यांना सर्वाधिक लीड मिळवून द्यायचे असल्याने दोन्ही तालुक्यातील महिलांनी प्रचाराची धुरा स्वतःच्या हाती घेतली असून प्रचाराची राळ उडवून दिलेली आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यात त्यांना चांगले वातावरण निर्माण झालेले आहे. प्रचारातील लंके यांची आघाडी कायम असून विरोधकांकडून आघाडी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र त्यात त्यांना अपयश येत आहे.



## साकूरच्या दरोड्यातील पाच आरोपींच्या मुसक्या आवळल्या

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील साकुर येथे घडलेल्या ज्वेलर्स दुकानातील दरोड्यातील पाच आरोपींच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांना यश आले आहे. त्यांना बेलवंडी (ता. श्रीगोंदा) येथून ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून २० तोळेसह १५ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांना पुढील तपासासाठी घारगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. दयावान उर्फ मनोज बाळासाहेब साठे, (वय २५, रा.गोरडवाडी, ता.माळशिरस, जि.सोलापूर), अजय उर्फ भोऱ्या उर्फ भोल्या बाळु देवकर, (वय २२, रा.कौठेयमाई, ता.शिरूर, जि.पुणे), योगेश अंकुश कडाळे, वय २७, रा.धामणी, लोणी, ता.आंबेगाव, जि.पुणे), आकाश ठकाराम दंडवते, (वय २८, रा.मलठण, ता.शिरूर, जि.पुणे), असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्यांच्याकडून ३० हजार रुपयांचा गावठी कट्टा व २ जिवंत काडतुसे असा ९२ हजार रुपयांच्या मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तर धोंडया महादु जाधव (फरार), मन्ना उर्फ सुरजसिंग उर्फ अजयसिंग (रा.पंजाब (फरार) यांचा शोध पोलीस घेत आहे.

**स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची कारवाई**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या माहितीनुसार पथकाने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयामध्ये मनोज साठे, रा.माळशिरस, जि.सोलापूर यास निष्पन्न करुन त्याचा व गुन्हयातील चोरी मनोज साठे याने केला असल्याचे तपासात पुढे आले. तसेच त्याचा साथीदार धोंडया जाधव, व सुनिल उर्फ निल चव्हाण, चोरीचा मुद्देमाल विक्रीकरण्याकरिता दिला असल्याचे समोर आले. त्यानुसार पथकाने पुणे येथून ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्यातील दागिने अभिषेक महेश तळेगावकर (रा.रविवार पेठ, पुणे) याचेकडे विक्रीसाठी दिल्याचे सांगीतले. त्यानुसार पथकाने अभिषेक महेश तळेगावकर याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून १५ लाख ३ हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

## येरवड्यातील चार गुंडांना तडीपार करण्याचे आदेश




**दि.१८, पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येरवडा भागातील चार सराइतांना शहर, जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांनी दिले. वनराज महेंद्र जाधव (वय २१), यशराज आनंद इंगळे (वय २३ ), हिमालय ऊर्फ गोलु मिट्टु बिश्त (वय २१, तिघे रा. लक्ष्मीनगर, येरवडा) आणि मयुर विष्णु गुंजाळ (वय २६, रा शनीआळी, येरवडा) अशी तडीपार केलेल्या सराइतांची नावे आहे. वनराज जाधव टोळीप्रमुख आहे. जाधव, इंगळे, बिश्त, गुंजाळ यांच्याविरुद्ध खून, दहशत माजविणे, तोडफोड, शस्त्र बाळगणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. जाधवसह साथीदारांना पुणे, पिंपरी-चिंचवड शहर, तसेच जिल्ह्यातून तडीपार करण्यात यावे, असा प्रस्ताव येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र शेळके, पोलीस निरीक्षक पल्लवी मेहेर, स्वाती खेडकर, उपनिरीक्षक महेश फटांगरे, उपनिरीक्षक सुर्वे यांनी तयार केला. पोलीस अधीक्षक मनोज पाटील, उपायुक्त हिम्मत जाधव यांनी प्रस्तावाला मंजुरी दिली. त्यानंतर जाधव याच्यासह चौघांना शहरातून तडीपार करण्याचे आदेश देण्यात आले.

# संपादकीय



## धारावीविषयी नवा दृष्टिकोन हवा!

धारावी पुनर्विकास प्रकल्प बांधकाम व्यवसायाचा अनुभव नसणाऱ्या आणि मुंबईबाहेरील अदानी उद्योग समूहाला देण्यात यावा की नाही, यावर सध्या बरीच मतमतांतरे दिसतात. या प्रकल्पामुळे अदानी उद्योग समूहाला प्रकल्पाची ५४० एकर जमीन, मुंबईमधील विविध ठिकाणच्या ५०० एकर जमिनी, विकास करात सूट आणि हस्तांतर होणाऱ्या चटई क्षेत्रात वाटा मिळाला आहे. पुनर्विकासाचे अनेक उत्तम पर्याय उपलब्ध असताना ते डावलून मुंबईच्या होऊ घातलेल्या या लुटमारीला जाणत्या मुंबईकरांचा पाठिंबा नाही. पण केवळ हा प्रकल्प अदानी समूहाकडून काढून घेणे मुंबईकरांच्या भविष्याच्या दृष्टीने का पुरेसे नाही हेही पाहायला हवे

सुमारे ३० वर्षांपूर्वी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी झोपडपट्टीमुक्त मुंबईचे स्वप्न पाहिले. अर्थव्यवस्था, शहरांबद्दलचे अपुरे ज्ञान आणि प्रशासकीय अनुभवाचा अभाव यामुळे ते स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही. याच चुकांच्या पायावर शिंदेंच्या नेतृत्त्वाखालील युती सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानींना सोपविला. मुंबईकरांनी यामागचे राजकारण आणि अर्थकारण समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी काही वर्षे मागे जाऊन परिस्थिती समजून घ्यावी लागेल.

मुंबई स्वतंत्र महाराष्ट्राची राजधानी झाल्यापासून येथील अर्थव्यवस्था झपाट्याने वाढू लागली. सत्तरच्या दशकात मराठवाड्यात महाप्रचंड दुष्काळ पडला. या दोन कारणांमुळे स्थलांतरितांचे लोंढे मुंबईभर पसरू लागले. तेव्हा स्थलांतरितांना विरोध हा राजकीय मंत्र असल्याने त्यांना वाढत्या शहरात सामावून घेण्याचा विचार झाला नाही. धोरणाच्या अभावाचा गैरफायदा घेत जमीन माफियांनी झोपडवस्त्या वसवून स्थलांतरितांना आश्रय दिला. कायदा आणि शासकीय बळाचा वापर होऊनही अशा वस्त्यांत वाढ होतच राहिली. मोक्याच्या जागी, खाडी आणि दलदलीच्या जमिनींवर धारावी कोळीवाड्यालगत असलेल्या जमिनीवर अनधिकृत उद्योग आणि वस्ती प्रस्थापित झाली ती याच काळात.

अशा राजकीय-प्रशासकीय हतबलतेच्या काळात नाईलाजाने झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा विचार सुरू झाला. १९८५ साली राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने धारावी झोपडवस्ती पुनर्विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिला. रहिवाशांनी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या. म्हाडाने जमीन विनामोबदला दिली. मालकी हक्काच्या घरासाठी रहिवाशांनी बांधकाम खर्चात वाटा उचलला. रहिवाशांचा सामूहिक आर्थिक सहभाग आणि म्हाडाच्या आर्थिक, तांत्रिक प्रशासकीय मदतीतून दहा वर्षांत ३८०० घरे बांधली गेली. लोकांच्या गरजा आणि ऐपत या दोन्ही निकषांचा विचार करून याच धर्तीवर इतर झोपडपट्ट्यांसाठी शासनाने 'स्लम रिडेव्हलपमेंट स्कीम' तयार केली. ही सर्व प्रक्रिया आशादायक असली तरी संथ होती. परंतु त्याला अचानक खीळ बसली.

दहा वर्षांत- १९९५ मध्ये मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे आश्वासन देत महाराष्ट्रात शिवसेनेने सत्ता मिळवली. बाळासाहेब ठाकरे यांचे हे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी सरकारने धोरण आखले. प्रत्येक पात्र झोपडी धारकाला २५० चौ. फुटांचे मालकी हक्काचे घर विनामोबदला देण्याचे आश्वासन दिले गेले. खासगी विकासकांना वाढीव चटई क्षेत्राच्या बांधकामातून रास्त नफा मिळेल आणि त्यातून ते झोपडीवासीयांसाठी घरे बांधतील असा साधा-सोपा हिशेब त्यामागे होता. शासनाला आणि झोपडीवासीयांना पैसे खर्च करावे लागणार नव्हते आणि तरीही झपाट्याने मुंबई झोपडपट्टीमुक्त होईल अशी अपेक्षा तेव्हा होती. सर्वांना लाभ देणारी ही योजना आकर्षक वाटली नसती तरच नवल. त्यामुळे तेव्हा त्याला पुरेसा राजकीय विरोध झाला नाही.

# निसर्गोपचार आणि बेनेडिक्स लस्ट !

**निसर्गोपचाराची उत्पत्ती १९व्या शतकात शोधली असेल, असे म्हटले जाते. जेव्हा ती युरोपीयन डॉक्टर आणि तत्वज्ञांच्या गटाने विकसित केली होती. जे त्या काळातील पारंपरिक वैद्यकीय पद्धतींना पर्याय शोधत होते. युनायटेड स्टेट्समध्ये निसर्गोपचार प्रथम २०व्या शतकाच्या सुरवातीस बेनेडिक्स लस्ट यांनी सादर केला.**

ज्यांना अनेकदा निसर्गोपचाराचे जनक मानले जाते. तेथील शासनाने सन १९०२ साली न्यूयॉर्कमध्ये निसर्गोपचाराची पहिली शाळा स्थापन केली आणि पुढील अनेक दशके निसर्गोपचाराची तत्त्वे व पद्धतींचा प्रचार करण्यात घालवली. निसर्गोपचार वर्षानुवर्ष विकसित झाला आहे तथा आता त्यामध्ये हर्बल औषध, पोषण, एक्युपंक्चर, होमिओपॅथी आणि जीवनशैली समुपदेशन यांसह विविध उपचार व तंत्रांचा समावेश आहे. निसर्गोपचाराचे डॉक्टर, ज्यांना त्या उपचाराचा सराव करण्यासाठी प्रशिक्षण आणि परवाना मिळालेला आहे. ते सहसा इतर आरोग्यसेवा प्रदात्यांच्या मदतीने रुग्णांच्या काळजीसाठी सर्वांगीण दृष्टिकोन प्रदान करू लागले आहेत. निसर्गोपचार हा आरोग्य सेवेसाठी एक समग्र उत्तम दृष्टिकोन आहे. ज्याचा उद्देश आहे की एखाद्या विशिष्ट स्थितीच्या लक्षणांऐवजी संपूर्ण व्यक्तीवर उपचार करणे आहे. नॅचरोपॅथिक प्रॅक्टिशनर्स विविध प्रकारच्या आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी विविध प्रकारच्या नैसर्गिक उपचारांचा वापर करतात. अगदी यासह - मधुमेह, हृदयरोग आणि संधिवात असे जुनाट आजार. - संक्रमण आणि जखम अशी तीव्र परिस्थिती. - मानसिक आरोग्य स्थितीतील नैराश्य व चिंता. - निद्रानाश आणि थकवा अशी तणावसंबंधीत परिस्थिती. - इरिटेबल बोवेल सिंड्रोम आणि एसिड रिफ्लक्स अशा पाचन संस्था. - महिलांच्या आरोग्य समस्या- रजोनिवृत्ती, पीएमएस. - एनर्जी आणि दमा अशी बालरोगविषयक परिस्थिती. निसर्गोपचार चिकित्सक आरोग्यदायक जीवनशैलीच्या सवयींबद्दल प्रतिबंधात्मक काळजी आणि समुपदेशन देखील देऊ शकतात. जेणे करून सर्वांगीण कल्याणात मदत होईल.

१८ नोव्हेंबर हा दिवस भारतामध्ये निसर्गोपचार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. आजचा हा पाचवा निसर्गोपचार दिवस आहे. सन २०१८मध्ये आयुष मंत्रालयाने निसर्गोपचार दिवसाची अर्थात आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी यांची सुरुवात केली. निसर्गोपचार ही एक पारंपरिक उपचार पद्धती असून ती शरीराला कमीत कमी त्रास देऊन अवलंबिली जाते. या पद्धतीत कमीत कमी शल्यक्रिया आणि औषधांचा उपयोग केला जातो. ताण नियंत्रण, आरोग्यदायी आहाराचे योग्य नियमन, मानसिक संतुलन आणि पंचमहाभूतांचा योग्य वापर यांचा अवलंब करतात. यामुळे रोग होणे मुळातच टाळता येईल आणि रोग झालाच तर अंतर्गत चैतन्य तो पूर्ण बरा करेल, अशी या उपचार पद्धतीची धारणा असते. आजार पूर्णपणे बरा नाही झाला तर माती, पाणी, सूर्यप्रकाश व शुद्ध हवा यांच्या मदतीने उपचार करून रोगाची तीव्रता कमी करता येते. निसर्गोपचार पद्धतीत पुढीलप्रमाणे सहा मूलतत्त्वे आहेत.



**निसर्गोपचाराचे उपाय करणाऱ्यांनी ही तत्त्वे पाळावयाची असतात-**

१) रुग्णाला कोणतीही इजा होणार नाही याची खबरदारी घेऊन त्याच्यावर उपचार केले जावेत. २) व्यक्तीच्या शरीरातील अंगभूत प्रतिकारक्षमता ओळखून त्याच्या अंगी असलेल्या आजार बरा करणाऱ्या शक्तीचा आदर करावा आणि स्वत:हून आजार बरा करण्याचे चैतन्य त्याच्यात निर्माण करावे. ३) आजारामागील कारणे ओळखावीत आणि त्यांचे निराकरण करावे. दिसणारी लक्षणे दाबू नयेत किंवा दुर्लक्षित करू नयेत. ४) स्वत:चे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला शिक्षित करावे. त्याला निरोगी राहण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. तसेच स्वत:च्या शारीरिक क्षमतेबद्दलची जबाबदारी स्वत:ची आहे हे पटवून द्यावे. ५) उपचार करताना प्रत्येक व्यक्तीच्या सवयी, आहार व अनारोग्य यांचा विचार करून उपचार करावा. ६) प्रत्येक व्यक्तीने आपल्या अवतीभवतीचे लोक आणि समाज यांना आरोग्याचे महत्त्व सांगावे. तसेच आजार कसा टाळावा व स्वास्थ्य कसे राखावे, हेही सांगितले जाते.

जीवसृष्टी आणि पर्यावरण या वैद्यक निसर्गातील घटकांद्वारे आजार बरा करण्याच्या पद्धतीला निसर्गोपचार किंवा निसर्गोपचार पद्धती म्हणतात. निसर्गाशी सुसंवादी व निसर्गानुकूल, औषधविरहित उपचार पद्धती अशीही निसर्गोपचाराची व्याख्या करतात. निसर्गोपचार पद्धती ही एक पर्यायी उपचार पद्धती आहे. प्रत्येक व्यक्तीला झालेल्या किंवा होणाऱ्या आजारावरील उपचार शरीरांतर्गत असून त्या व्यक्तीच्या शरीरात निसर्गत: आजार वा रोग बरा करण्याची क्षमता तसेच रोगप्रतिकारकशक्ती असते. त्यामुळेच झालेला आजार वा रोग निसर्गत: बरा करणे आणि आरोग्य कायम राखणे त्या व्यक्तीला शक्य असते, असे या उपचार पद्धतीमागील तत्त्व आहे.

भारतात निसर्गोपचाराचे शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम देणाऱ्या अनेक संस्था अस्तित्वात आहेत. त्यातील काही सुप्रसिद्ध संस्था- तामिळनाडू डॉ.एम.जी.आर चेन्नई वैद्यकीय विद्यापीठ, बेंगळुरू निसर्गोपचार आणि यौगिक विज्ञान विद्यालय, पुणे नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी, हैदराबाद ऑल इंडिया नेचर क्युअर फेडरेशन, नवी दिल्ली मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था अशा आहेत.

निसर्गोपचार ही एक सर्वांगीण औषध प्रणाली आहे. ज्याचा उद्देश शरीराच्या स्वतःला बरे करण्याच्या नैसर्गिक क्षमतेला समर्थन देणे आहे. नॅचरोपॅथिक प्रॅक्टिशनर्स रुग्णांवर उपचार करण्यास विविध पद्धतींचा वापर करू शकतात. ज्यात पोषण, हर्बल औषध, एक्युपंक्चर आणि जीवनशैली समुपदेशन यांचा समावेश आहे. निसर्गोपचार काही जुनाट परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. परंतु हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की ती पारंपरिक वैद्यकीय सेवेची बदली नाही आणि ती गंभीर किंवा जीवघेण्या परिस्थितीसाठी एकमात्र उपचार म्हणून वापरली जाऊ नये. जर आपणास एखाद्या गंभीर वा संभाव्य धोकादायक आजाराबद्दल काळजी वाटत असेल तर योग्य आरोग्यसेवा प्रदात्याचा सल्ला घेणे महत्वाचे आहे.

**- संकलन -**
**श्री.कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी,**
**गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

# विश्वंभर बाबा दिंडी सोहळ्याचे आळंदीकडे प्रस्थान...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१८, मेढा :** चला आळंदीला जाऊ ज्ञानेश्वर डोळा पाहु ज्ञानोबा माऊली तुकाराम ाचे गजरात विश्वंभर बाबा दिंडी सोहळा मेढा विभाग व केळघर विभाग यांचे तर्फ मेढा ते श्री श्रेत्र आळंदी पदयात्रा मंगळवार पासुन सुरु होत आहे.वै.हभप भिकोबा महाराज देशमुख यांचे कृपाशिर्वादाने, दिंडी प्रमुख अतुलजी महाराज देशमुख यांचे नेतृत्वा खाली दिंडी सोहळा होत आहे श्री श्रेत्र मामुर्डी व गांजे येथुन मेढा येथे श्री विठ्ठल मंदिरात दिंडी एकत्र येणार आहेत तेथुन दिंडी सोहळा आळंदी कडे प्रस्थान करणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक मेढा मार्गे सरताळे, सुरुर परीट मळा, पारगाव खंडाळा, शिंदेवाडी, श्री सिद्दीविनायक हॉस्पीटल शिवरे, मराठा भाडेवाला धर्मशाळा गुरुवार पेठ पुणे, एच पी पेट्रोल पंप शेजारी विश्वंभर बाबा दिंडी धर्मशाळा आळंदी, असा पायी दिंडी प्रवास सोहळा होणार आहे.

सदर सोहळ्यात श्रीरंग पवार आलेवाडी, सखाराम कारंडे, गायकवाड बंधु सुरुर, राजेंद्र बुलंगे प्रशांत चव्हाण शिवाजी बांदल, सुनिल पवार ( खंडाळा बावडा) ग्रामस्थ पारगांव ग्रामस्थ शिंदेवाडी, रामचंद्र सोनावणे, राजेंद्र सोनावणी, मच्छिंद्र डिंबळे परिवार, बाबुराव शेलार, रामचंद्र दातीर बंधु केंजळ, अजय



धनावडे, मारुती धनावडे, अनिल दुंदळे, हौसाबाई ओंबळे, प्रताप धनावडे, योगेश पवार याचेकडून अन्नदान होणार आहे.तसेच द्वादशी पंगती भोजन दत्तात्रय जाधव कोंडीबा बुवा वांगडे पिंपरी यांचे होणार आहे.

तसेच दिंडी सोहळ्यात विणेकरी शिवराम मोरे, शंकर जवळ, सेवेकरी विठ्ठल जुनघरे, नवनाथ चिकणे, विजय सावंत, दतात्रय धनावडे, वेणूबाई रांजणे, प्रवचन सेवा भांडवलकर महाराज, काशिनाथ बुवा भोसले, विठ्ठल महाराज कदम यांची होणार आहे. तरी सर्व भाविकांनी दिंडी सोहळ्यात सामील व्हावे असे आवाहन हभप दिपेश महाराज जाधव यांनी केले आहे.

## रात आधली...

महत्वाची असे रात
निवडणूकी आधली
यश झुके त्यांचेकडे
वेळ बरोबर साधली

भेट वस्तू पैसे वाटप
सवय कुणा बाधली
पाण्याऐवजी दारुची
पुरवा लोका बादली

अप प्रचार करायचा
निवडणूक रे लादली
संभ्रम वावटळ वाढे
मतदार मना मधली

छुपा प्रचार चालला
मूक घोष निनादली
विरोधात जे पोलीस
करावी त्यांची बदली

बदनाम हो समोरचा
आयडिया रे शोधली
लपडी बाहेर काढली
कबर मोठी खोदली

मतदात्या सावध हो
सुवर्ण संधी दिधली
मतदान करा अचूक
वाट तवजरी रोधली

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# मतदारांनी कोणत्याही आमिष, दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे




**दि.१७, बुलढाणा :** विधानसभा निवडणुकीचे मतदान येत्या २० नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतदारांनी कोणत्याही प्रकारच्या आमिष, दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यातील मलकापूर, बुलढाणा, मेहकर, सिंदखेड राजा, खामगांव, चिखली आणि जळगांव जामोद या सातही विधानसभा मतदारसंघात एकाच दिवशी दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू आहे.या निवडणुकीच्या काळात मतदारांना विविध प्रकाराचे आमिष, दबाव टाकण्याचे प्रकार उघडकीस येतात. निवडणूक काळात मतदारांना कोणत्याही प्रकारचे आमिष, दबाव टाकले जात असल्यास तात्काळ प्रशासनाला कळवावे आणि कोणत्याही आमिष, दबावाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे.

भारत निवडणूक आयोगाने मतदारांच्या तक्रारींसाठी सीव्हिजील अॅप उपलब्ध केले असून त्यावरही तक्रार करता येणार आहे. तसेच जिल्ह्यात आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांवरील कारवाईसाठी भरारी पथक, स्थिर सर्वेक्षण पथके, पोलीस प्रशासन, आयकर विभाग आणि जीएसटी विभागाचे पथक कार्यरत करण्यात आले आहेत. मतदारांनी आचारसंहितेच्या उल्लंघनाविषयीच्या घटना या पथकांच्या निदर्शनास आणाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

**मतदान केंद्रात मोबाईलवर बंदी**

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोबाईलवर बंदी राहणार आहे. मतदान केंद्रात मतदारांनी मोबाईल व इतर ईलेक्ट्रॉनिक वस्तू आणू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

**मतदानासाठी चार व्यक्तींना प्रवेश**

मतदान केंद्रावरील गर्दी, रांग कमी करण्यासाठी एकावेळी चार जणांना मतदानासाठी प्रवेश दिला जाणार आहे.

**मतदान केंद्रात विविध सुविधा**

मतदान केंद्रावर मतदारांसाठी प्रतिक्षालय, बेंच, दिव्यांगांसाठी व्हिलचेअर आदी सुविधा पुरविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**मतदानासाठी १२ ओळखपत्र ग्राह्य...**

मतदान कार्ड अभावी मतदार मतदानापासून वंचित राहू नये यासाठी निवडणूक आयोगाने १२ प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले आहेत. त्यानुसार आधार कार्ड, पॅन कार्ड,मनरेगाचे रोजगार ओळखपत्र, बँक किंवा टपाल विभागाचे पासबुक, आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, भारतीय महानिबंधक आणि जनगणना आयुक्तांनी जारी केलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), निवृत्तीवेतनाचे दस्तावेज, केंद्र अथवा राज्य शासन, तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना वितरित केलेले छायाचित्र ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांचे अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र हे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत. मतदारांनी यापैकी कोणतेही ओळखपत्र सोबत आणून मतदान करावे. येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा दिवस आहे. मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क निर्भीडपणे बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## जि.प.आदर्श मराठी शाळा वाल्मिकी नगर येथे मतदान जागृती



**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.१८, दापोली (रत्नागिरी) :** राज्यात येत्या २० नोव्हेंबरला विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होत आहे. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जि.प.आदर्श मराठी शाळा वाल्मिकीनगर येथील विद्यार्थ्यांनी मतदान जागृती प्रभातफेरी काढून मतदारांमध्ये जाणीव जागृती केली. मतदान करा मतदान करा, लोकशाहीचा मान करा... (करा योग्य मतदान, उंचवा आपले जीवनमान) अशा घोषणा देवून मतदान जागृती केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ जाधव, उपशिक्षक रमेश पारधी तसेच सागरी सुरक्षा रक्षक मयूर राक्षे उपस्थित होते.

## नैराश्यात शेतकऱ्याने संपवले जीवन



**अक्षराज : मांगीलाल राठोड**

**दि.१८, किनवट (नांदेड) :** कधी नापिकी तर कधी पिकांना मातीमोल भाव, डोक्यावरील कर्ज फेडायचे कसे, याच्या तणावात ३५ वर्षीय शेतकऱ्याने औषध पिऊन आत्महत्या केली. ही घटना किनवट तालुक्यातील पाटोदा खु. शिवारात नुकतीच घडली आहे. पाटोदा खु.येथील तरूण शेतकरी मनोहर श्रीराम खिसले यांनी शेतात लाखो रूपये खर्च करून सोयाबीन चे पीक घेतले. मात्र, बाजारात दर मिळत नसल्याने त्यामुळे उत्पादन खर्चही निघाला नाही. यानंतर त्यांनी रोज मजुरी सुरू केली. मात्र, काम कुठे लागत नसल्याने परिणामी शेतीसाठी घेतलेल्या कर्जाचा डोंगर वाढत गेला. सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून त्यांनी शेतातील औषध पिऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळी घडली. ही घटना घरच्यांना कळताच लगेच मनोहर श्रीराम खिसले याला गोकुंदा येथील आरोग्य केंद्रात दाखल केले आदिलाबाद येथे त्यांना हलवण्यात आले होते. पण काही अंतरावर गेल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. मयत मनोहर श्रीराम खिसले यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, मुलगी असा परिवार आहे.

## हदगाव विधानसभेसाठी वृद्ध, दिव्यांगाचे ९३ टक्के गृह मतदान



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१८, हदगांव (नांदेड) :** हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदार संघासाठी ८५ वया पेक्षा अधिक असलेले १९८ वृध्द तसेच १८ दिव्यांग अशा २१६ मतदारांची गृह मतदानासाठी नोंदणी झाली होती पैकी २०१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावल्याने ९३ टक्के मतदान झाले आहे.यात ७ मतदार घरी गैरहजर होते आणि नोंदणी झाल्यापैकी ८ मतदार मयत झाले आहेत असे निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश कांबळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती पल्लवी टेमकर टपाली मतदान पथक प्रमुख जी.डी.हाराळे, एम.झेड सिद्दीकी, सुनिल राठोड यांनी सांगितले.

तालूक्यातील शिरड येथील १०४ वयाच्या जिजाबाई फकीरराव कल्याणकर यांनी गृह मतदानाचा हक्क बजावल्याने निवडणूक निरीक्षक (सामान्य) शैलेन्द्र कुमार यांनी तसेच सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा हदगावच्या तहसिलदार सुरेखा नांदे यांनी शिरड येथे जावून वृद्ध जिजाबाई यांची भेट घेऊन त्यांचे कौतूक करुन जिजाबाई १०४ वयात मतदान करतात तेव्हा सर्व मतदारांनी मतदान केंद्रावर जावून मतदान करावे असे आवाहन निवडणूक निरीक्षक शैलेन्द्र कुमार यांनी उपस्थित नागरीकांना केले आहे.या आधीही निवडणूक निरीक्षकांनी तालुक्यातील ल्याहरी येथील बैल बाजारात जावून उपस्थित नागरीकांना निर्भयपणे मतदान केंद्रावर जाऊन मतदान करा असे आवाहन केले आहे.

## विधानसभा निवडणुकीसाठी नूतन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केला अनोखा उपक्रम




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१८, कल्याण (ठाणे) :** निवडणूक विभागाने विधानसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी शहरात विविध जनजागृतीचे उपक्रम राबविण्यात येत आहेत. कल्याण मधील छत्रपती शिक्षण मंडळाची नूतन विद्यालय कर्णिक रोड येथील विद्यार्थ्यांनी मतदानाचा जागर करण्यासाठी प्रिय आई-बाबांना पोस्ट कार्ड पत्र लिहिले. लोकशाहीच्या या उत्सवांमध्ये प्रत्येकाने सहभागी व्हावे या अनोखा सामाजिक मतदान जनजागृती संदेश नूतन विद्यालयाचे उपक्रमशील कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांच्या संकल्पनेतून १००० विद्यार्थ्यांनी पोस्ट कार्ड लिहून अनोखा उपक्रम केला. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा मतदानाच्या दिवशी सर्व कामे बाजूला ठेवून माझ्या व भारताच्या उज्वल भविष्यासाठी प्रिय आई बाबा मतदान जरूर करा भारताची लोकशाही बळकट करा विद्यार्थ्यांनी प्रिय आई बाबा यांना लिहिलेल्या पोस्ट कार्डवर अतिशय सुंदर स्लोगन लिहिले मतदानासाठी वेळ काढून आपला हक्क बजवावा.

सर्वांनी मतदान करूया तोच देश होईल महान या देशाचे शंभर टक्के मतदान. जागरूक नागरिक होऊया अभिमानाने मत देऊया. आपल्या मताचे दान. आहे लोकशाहीची शान. अशाप्रकारे संदेश विद्यार्थ्यांनी सुंदर हस्ताक्षरात पोस्ट कार्डवर लिहिली आहेत. या उपक्रमासाठी संस्थेचे पदाधिकारी आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.रेश्मा सय्यद मॅडम यांनी विद्यार्थ्यांचे आणि कलाशिक्षक श्रीहरी पवळे यांचे आणि उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले आहे. नूतन विद्यालय नेहमीच वेगवेगळे विविध उपक्रम करीत असते हा ही सामाजिक उपक्रमाचे पालक आणि कल्याण मधील प्रतिष्ठित नागरिकांनी उपक्रमास कौतुकाचा वर्षाव केलेला आहे.

# दुर्मिळ होत असलेल्या चिमण्या पाहाव्यास मिळाल्या...



**अक्षराज : उमेश जोशी**

**दि.१८, पानगाव (लातूर) :** जुन्या काळात रोज बगण्यात येणाऱ्या चिमण्या, कळवा, हे पक्षी मोबाईल व इंटरनेट सेवा आल्या पासून पाहण्यास दुर्मिळ होत जात आहेत.

पूर्वीची काळची सकाळ ही पक्षाच्या किलबिल ने होत असे पण गेल्या काही वर्षा मध्ये इंटरनेट व मोबाईल सेवेचा वापर खूप प्रमाणात वाढला आणि चिमणी, कावळा हे पक्षी अगदी दुर्मिळ झाले पूर्वीची सकाळ हि पक्षा च्या किलबिली ने सुरु होत असे हे दृश्य आता खूप दुर्मिळ झाले आहे. पूर्वी साधे मोबाईल होते. तो पर्यत हे पक्षी पहाव्यास मिळत असे परंतु गेल्या काही वर्षा मध्ये स्मार्ट मोबाईल व इंटरनेट सेवा आली.

त्यात सुरवातीला २जी सेवा ३जी, ४जी आणि आता ५ जी सेवा अशी त्यात प्रगती झाली आणि हि पक्षा च्या किलबिली ने सुरु होणारी सकाळ हि अक्षरक्षा बंदच झाली आणि चिमणी, कावळे हे पक्षी दिसणे अगदी दुर्मिळ झाले.

आजचा दिवस खास ठरला, कारण बऱ्याच दिवसा नंतर चिमण्यांचा थवा पाहायला मिळाला. अंगणात जमा झालेल्या या छोट्या पाहुण्यांनी आपल्या चिवचिवाटाने शांत वातावरणात गोड ध्वनी निर्माण केला. शहरीकरणाच्या वेगात हरवत चाललेल्या चिमण्या पुन्हा दिसू लागल्याने निसर्गप्रेमींना आनंद झाला आहे. या छोट्या पक्ष्यांचे अस्तित्व जपण्यासाठी त्यांच्या निवासस्थानांची काळजी घेणे आपले कर्तव्य आहे.

चिमण्यांसाठी टाकाऊ बाटल्यांपासून तयार केलेले घरटे, अंगणात धान्याचा तांडा किंवा पाण्याचा कट्टा ठेवला तर या गोड पाहुण्यांना पुन्हा घरट्यांसाठी जागा मिळेल. निसर्गाच्या या लहानशा भेटीने आपला दिवस आनंददायी होईल.

# सामाजिक बांधिलकी जपणारा पुरुष प्रधान !!

**- प्रविण बागडे, नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**



आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा पुरुषांना तोंड द्यावे लागणाऱ्या अनेक समस्यांसाठी जागतिक जागरुकता दिन आहे, ज्यात पालकांचा अलिप्तपणा, अत्याचार, बेघरपणा, आत्महत्या आणि हिंसाचार यांचा समावेश आहे. दरवर्षी हा दिवस १९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. जेव्हा प्रत्येक दिवस पुरुषप्रधान मानला जाऊ शकतो तेव्हा पुरुषांना जागरुकता दिवसाची गरज कां आहे? असा प्रश्न अनेकांना पडेल. अधिकृत दिवसांमध्ये 'अंडरडॉग'ची कबुली दिली जाते आणि म्हणूनच हा नोव्हेंबरचा उत्सव भुवया उंचावत आहे. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे सर्व सहा स्तंभ'. मुलांचे आणि पुरुषांचे जीवन, कर्तृत्व आणि योगदान, विशेषत: राष्ट्र, संघ, समाज, समुदाय, कुटुंब, विवाह आणि बालसंगोपन यातील त्यांच्या योगदानाबद्दल साजरे करण्याचा हा एक प्रसंग आहे.

आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची उद्दिष्टे सकारात्मक पुरुष आदर्शांना प्रोत्साहन देण्यासाठी; केवळ सिनेतारक आणि क्रीडापुरुषच नव्हे तर दैनंदिन, श्रमिक वर्गातील पुरुष जे सभ्य, प्रामाणिक जीवन जगत आहेत. समाज, समुदाय, कुटुंब, विवाह, मुलांची काळजी आणि पर्यावरणात पुरुषांचे सकारात्मक योगदान साजरे करण्यासाठी, पुरुषांच्या आरोग्यावर आणि आरोग्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी: सामाजिक, भावनिक, शारीरिक आणि आध्यात्मिक, सामाजिक सेवा, सामाजिक दृष्टीकोन आणि अपेक्षा आणि कायदा या क्षेत्रांमध्ये पुरुषांवरील भेदभाव हायलाइट करण्यासाठी, लैंगिक संबंध सुधारण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी, एक सुरक्षित, उत्तम जग निर्माण करण्यासाठी, जिथे लोक सुरक्षित राहू शकतील आणि त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचू शकतील.

जरी आंतरराष्ट्रीय पुरुष आणि महिला दिन हे 'लिंग-केंद्रित' कार्यक्रम मानले जात असले तरी ते वैचारिक आरशातील प्रतिमा नाहीत कारण ते पुरुष किंवा स्त्रियांसाठी अद्वितीय मानल्या जाणाऱ्या समस्यांवर प्रकाश टाकतात. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा इतिहास प्रामुख्याने पुरुष आणि मुलांच्या अनुभवांसाठी अनन्य समजल्या जाणाऱ्या समस्यांशी संबंधित आहे, तसेच सकारात्मक रोल मॉडेल्सवर भर दिला जातो, जे विशेषतः 'सामाजिक संदर्भात आवश्यक मानले जाते जे सहसा पुरुषांच्या प्रतिमांनी आकर्षित होते. वाईट वागणे, सकारात्मक पुरुष रोल मॉडेल्स हायलाइट करताना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा हे दाखवण्याचा प्रयत्न करते की सर्व वयोगटातील पुरुष सकारात्मक रोल मॉडेल्सपेक्षा जास्त उत्साही प्रतिसाद देतात ते नकारात्मक स्टिरिओटाइपिंग करतात.' इतर पुरुष हक्क कार्यकर्त्यांनी आयएमडीच्या निमित्ताने प्रश्न विचारले, कौटुंबिक हिंसाचार आणि मुलांचा ताबा या कायद्यांमध्ये लैंगिक तटस्थतेच्या अभावावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ऑल इंडिया मेन्स वेल्फेअर असोसिएशनच्या चेन्नई चॅप्टरने आयएमडी २०१४ वर सरकारला एक निवेदन सादर केले होते, ज्यामध्ये पुरुष कल्याण मंत्रालय, राष्ट्रीय पुरुष आयोग स्थापन करण्याची आणि सर्व कायदे लिंग तटस्थ बनविण्याची मागणी केली.

थॉमस ओस्टर यांनी ७ फेब्रुवारी १९९२ रोजी उद्घाटन केले, आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या प्रकल्पाची संकल्पना एक वर्षापूर्वी म्हणजे ८ फेब्रुवारी १९९१ रोजी करण्यात आली. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा सर्वात जास्त काळ चालणारा उत्सव माल्टा आहे, जेथे ७ फेब्रुवारी १९९४ पासून घटना घडल्या आहेत. माल्टा हा एकमेव देश होता ज्याने फेब्रुवारीची तारीख साजरी केली आणि समाजातील त्यांचे योगदान, माल्टीज ए.एम.आर. समितीने २००९ मध्ये आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाची तारीख १९ नोव्हेंबर वर हलवण्यासाठी मतदान केले. जेरोम तेलुकसिंग, ज्याने या कार्यक्रमाचे पुनरुज्जीवन केले, त्याने १९ नोव्हेंबर हा दिवस आपल्या वडिलांच्या वाढदिवसाच्या सन्मानासाठी निवडला आणि त्या तारखेला १९८९ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या फुटबॉल संघाने विश्वचषक स्पर्धेसाठी पात्र होण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनी देशाला कसे एकत्र केले ते साजरे करण्यासाठी. तेलुक्सिंग यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन हा केवळ लिंगनिहाय दिवस म्हणून नव्हे तर पुरुष आणि मुले यांना प्रभावित करणाऱ्या सर्व समस्यांवर उपाय म्हणून प्रचार केला आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन आणि त्याच्या तळागाळातील कार्यकर्त्यांबद्दल म्हटले आहे, 'ते लैंगिक समानतेसाठी प्रयत्नशील आहेत आणि आपल्या समाजातील नकारात्मक प्रतिमा आणि पुरुषांशी संबंधित कलंक दूर करण्याचा संयमाने प्रयत्न करत आहेत'.

भारतातील आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा उद्घाटन सोहळा १९ नोव्हेंबर २००७ रोजी अग्रगण्य भारतीय पुरुष हक्क संस्था इंडियन फॅमिली द्वारे आयोजित करण्यात आला होता. १९ नोव्हेंबर ही तारीख ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडिज या वस्तुस्थितीवर आधारित स्वीकारण्यात आली होती. त्या तारखेला आधीच आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे निरीक्षण करत होते. २००८ मध्ये भारतात हा कार्यक्रम पुन्हा साजरा करण्यात आला आणि दरवर्षी हा उत्सव सुरू ठेवण्याची योजना आखण्यात आली. २००९ मध्ये भारताला आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचे पहिले कॉर्पोरेट प्रायोजकत्व प्राप्त झाले, ज्यामध्ये पुरूषवेअर ब्रँड ॲलन सॉलीने आंतरराष्ट्रीय पुरुष दिनावर प्रचारात्मक ऑफर तयार करण्याचा निर्णय घेतला आणि होम बॉक्स ऑफिसने १९ नोव्हेंबर रोजी त्याच्या 'मेन इन ब्लॅक' मालिकेत पुरुष-पॉझिटिव्ह चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला. २०१४ मध्ये कॉन्फिडेअर एज्युकेशन कन्सल्टन्सीने नवी दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय पुरुष दिनावर आर्ट गॅलरी आयोजित केली होती, तर कोलकाता येथे पुरुषांचे हक्क आणि वृद्धांच्या गैरवापरावर प्रकाश टाकण्यासाठी निदर्शने करण्यात आली होती.

२०१८ मध्ये पुरुषांसाठी एक कल्याणकारी आणि धर्मादाय ट्रस्ट, कायद्यातील लैंगिक तटस्थता, भारतातील पुरुष आयोग, भारतीय दंड संहितेचे कलम ४९८ (ए) रद्द करणे आणि बलात्कार कायद्याच्या गैरवापरावर कठोर कारवाई या मागण्यांसाठी कोलकाता येथे आंदोलन आयोजित केले. २०१९ मध्ये बंगळुरूच्या दोन प्रमुख रुग्णालये, एस्टर हॉस्पीटल्स आणि रिगल हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रोस्टेट कर्करोगाच्या जनजागृतीवर 'हेल्दी हिम' मोहीम राबवली. २०१७ आणि २०१८ मध्ये इतर अनेक जनजागृती उपक्रमांबरोबरच, स्वयंसेवकांनी नंदी हिल्स, भारत येथे बाईक रॅली काढली आणि ४०,००० हून अधिक लोक उपस्थित असलेल्या आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा केला. दामन वेल्फेअर सोसायटी अँड ट्रस्ट, सेव्ह इंडियन फॅमिली मूव्हमेंट अंतर्गत याच मुख्याध्यापकांवर काम करणारी आणखी एक प्रमुख एनजीओ देखील दरवर्षी आंतरराष्ट्रीय पुरुष दिन साजरा करते. २०१९ मध्ये त्याने कानपूरमधील रेव्ह ३ मॉलमध्ये एक दिवसभर भव्य कार्यक्रम आयोजित केला आणि आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त जागरुकता निर्माण केली. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या विपरीत, आंतरराष्ट्रीय पुरुष दिन अधिकृतपणे संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे मान्यताप्राप्त नाही.

**सर्व पुरुषांना आज आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !**

## निवडणुक पुर्व प्रक्रियेच्या तयारीचा निरीक्षक गुप्ता यांनी घेतला आढावा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, भंडारा :** विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेच्या तयारीने अंतिम टप्प्यात प्रवेश केला आहे. येत्या २० नोव्हेंबर रोजी या मतदारसंघात मतदान होणार असून, २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रियेच्या तयारीची सखोल पाहणी आणि आढावा निवडणूक निरीक्षक विजय गुप्ता यांनी घेतला. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी मांजे तहसीलदार निलेश कदम, वैभव पवार, धनंजय देशमुख, मटाले उपस्थित होते.

**मतदानाच्या तयारीसाठी सूचना -**

निवडणूक निरीक्षक विजय गुप्ता यांनी मतदानाच्या दिवशी चोख आणि सुरक्षित मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी मांजे यांना महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत. मतदानाच्या दिवशी



ईव्हीएम मशिन्सच्या वापरासह पोलिंग पार्टीचे नियोजन, पोलीस बंदोबस्त आणि इतर सर्व आवश्यक व्यवस्था सुनिश्चित करण्यात येणार आहे.

**सोयीसुविधांची खबरदारी -**

पोलिंग पार्टीसाठी पिण्याच्या पाण्याची योग्य सोय करण्यात यावी तसेच इतर आवश्यक सुविधा पुरविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, निवडणूक कार्यालयात फायर ब्रिगेड, पाण्याचे टँकर आणि इतर आपत्कालीन सोयी-सुविधा देखील उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**सुरक्षित आणि सुसज्ज मतदान प्रक्रिया -**

मतदान प्रक्रियेच्या अनुषंगाने सर्व तयारी व्यवस्थित आणि नियोजनबद्ध पद्धतीने होत आहे. यामुळे मतदारांना कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही याची दक्षता घेतली जात आहे. निवडणूक निरीक्षक व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान केंद्रांवरील सर्व व्यवस्था सुचारू पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज आहे.

नागरिकांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असून, साकोली मतदारसंघातील निवडणूक शांततेत पार पडेल असा विश्वास निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी मांजे यांनी व्यक्त केला आहे.

# निवडणूक कर्तव्यावरील कर्मचा-यांचे मतदान नोंदविण्याची प्रक्रिया सुरू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१८, अकोला :** जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीसाठी कर्तव्यावर असणा-या कर्मचा-यांपैकी ५ हजार ७७४ कर्मचा-यांनी दि. १६ नोव्हेंबर अखेर आपला मतदानाचा हक्क बजावला. सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर मतदान सुविधा केंद्रात या सर्व मतदान कर्तव्यावरील कर्मचा-यांचे म तदान नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती टपाली मतपत्रिका नोडल अधिकारी विजय पाटील यांनी दिली.

मतदान कर्तव्यावर असणारे ८ हजार ४३६ मतदान कर्मचारी, २ हजार २७० पोलीस, होमगार्ड कर्मचारी अशा एकूण १० हजार ७०६ कर्मचा-यांना टपाली मतदान करणे शक्य व्हावे म्हणून नमुना १२ वितरित करण्यात आला होता. ज्या कर्मचा-यांनी हा नमुना व आवश्यक कागदपत्रे जमा केली अशा १० हजार २०२ मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करता येणार आहे.

मतदान कर्तव्यावर नियुक्त १ हजार ९९३ कर्मचा-यांची नोंदणी राज्यातील इतर मतदारसंघात आहे. अशा मतदारांच्या मतपत्रिका देखील विभागस्तरीय व राज्यस्तरीय केंद्रातून प्राप्त झाल्या असून. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मतदान सुविधा केंद्रांकडे पाठविण्यात आल्या आहेत. एकूण १०



हजार २०२ मतदारांपैकी ५ हजार ७७४ मतदारांनी दि. १६ नोव्हेंबरअखेर आपला मतदानाचा बजावला.

उर्वरित निवडणूक कर्तव्यावर नियुक्त कर्मचा-यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावरील सुविधा केंद्रात जाऊन मतदान करावे, असे आवानहन जिल्हा निवडणूक अधिका-यांच्या वतीने करण्यात आले आहे. हे सुविधा केंद्र दि. १९ नोव्हेंबरपर्यंत कार्यान्वित असेल.

# तूतारी वाजवणाऱ्या माणसावरच शिक्का, माझा विजय पक्का : बापूसाहेब पठारे यांनी केली प्रचाराची सांगता

**अक्षराज : प्रणिल कुसळे**

**दि.१८,वडगाव शेरी (पुणे) :** महाविकास आघाडीचे वडगाव शेरी मतदार संघातील अधिकृत उमेदवार यांनी प्रचाराची सांगता करताना विजया बाबत आपल्या भावना व्यक्त केल्या. तुतारी वाजवणाऱ्या माणसाच्या निवडणूक चिन्हावरच जास्तीत जास्त शिक्का पडणार असून माझा विजय पक्का आहे,आमचे दैवत शरद पवार महाविकास आघाडीचा प्रचार आणि मी राबवलेली नियोजनबद्ध प्रचार मोहीम याला यश मिळाले असल्याचे प्रतिपादन बापूसाहेब पठारे यांनी प्रचाराची सांगता करताना सांगितले.



निष्क्रिय आणि बदनाम उम ेदवाराविरुद्ध आम्ही आवाज उठवला आणि आम्हाला सर्व स्तरातून प्रतिसाद मिळाला.सोबतीला स्थानिक प्रश्न देखील आम्ही जोरात उपस्थित केले. मोठ्या जाहीर सभा, दिग्गज नेत्यांची उपस्थिती, तळागाळात केलेल्या पदयात्रा आणि कार्यकर्त्यांचे परिश्रम यामुळे माझा विजय निश्चित झाला आहे,असेही त्यांनी सांगितले.

मतदार संघाबाहेरचे कोणतेही भावनिक प्रश्न आणि द्वेष निर्माण करणाऱ्या मोहिमा या विधानसभा मतदारसंघात चालल्या नाहीत,कारण हा विधानसभा मतदारसंघ मिनी इंडिया आहे आणि त्यांना सुरक्षित आणि प्रगतिशील कारभार देण्याचा निर्धार आम्ही केला आहे,असे त्यांनी आवर्जून सांगीतले. सर्वांचे आभार त्यांनी मानले आणि निकोप लोकशाही, संविधान प्रणित विकासाचा कारभार यासाठी सुजाण मतदार म्हणून मतदान करण्याचे आवाहन केले.

# पापच इतकी केलीत म्हणून बॉडीगार्ड घेऊन फिरायला लागतय : विक्रमसिंह पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१८, पाटण :** मी मंत्री असताना माझ्या मतदार संघात कधी भोंगा वाजवीला नाही. बॉडीगार्ड उभे केले नाहीत. गाड्यांचा ताफा भोंगा वाजवणे म्हणजे विकास नाही. आपल्या भागात गावात फिरताना चार-चार पोलिसांच्या गाड्या घेऊन भोंगे वाजवत फिरायचे, बॉडीगार्ड घेऊन फिरायचे कारण काय..? जिथं पापचं केल नाही तर घाबरायचे कारण काय..? विरोधकांची पाप स्पीकरवरती बोलण्यासारखी नाहीत. लोकांनी यांच्या पापांची खाजगीत माहिती घ्यावी असे सांगताना गेल्या दहा वर्षात विकास नाही तर तालुका भकास केला आहे. दारु बारची दुकाने वाढवून तरुणांना व्यसनाधीन करण्याचं काम यांनी केले आहे. सुज्ञ मतदारांनी याचा विचार करुन मतदान करावे असे आवाहन माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

पाटण मतदार संघाचे अपक्ष उमेदवार सत्यजितसिंह पाटणकर यांच्या प्रचारार्थ पाटण शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. हि रॅली पाटणकर वाड्या समोर आल्यानंतर झालेल्या सांगता सभेत विक्रमसिंह पाटणकर बोलत होते. यावेळी सत्यजितसिंह पाटणकर, हिंदूराव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर पुढे म्हणाले विकास केला म्हणत लोकांना फसवायचे, दिखाऊपणा चा विकास ग्रामीण भागातील लोकांना परवडणारा नाही. गेल्या दहा वर्षांत नवीन प्रकल्प यांनी आणला नाही. जे चालू होते ते बंद पाडण्याचा प्रयत्न केला. तरुणांच्या हातचा रोजगार पळवून लावला. हे वाईट विकृत व प्रवृत्ती चा माणूसच हे करु शकतो.



जनतेमध्ये जागृती निर्माण झाली आहे. कोणाचे राज्य येईल माहिती नाही परंतु ज्याचे राज्य येईल त्याला अपक्षाची गरज भासेल. त्यावेळी आपण योग्य भूमिकेत जाऊ. सगळे आपापसातील वाद विसरुन मदत करणार आहेत.सगळे उघड नाही परंतु छुपा पाठिंबा आपल्याला देत आहेत. सगळे पक्ष आज आपल्या सोबत आहेत. विधानसभा निवडणूक आता एकत्रित लढायची आहे. नवा पाटण तालुका घडवायचा आहे. यासाठी सर्व शक्ती सत्यजितसिंह पाटणकर यांच्या पाठीमागे उभी करायची आहे.

**दहा वर्षात जास्त प्रसिद्धीला आलेला प्रकल्प म्हणजे मलिदा गँग : सत्यजितसिंह पाटणकर**

यावेळी अपक्ष उमेदवार सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले आज निवडणूकीच्या प्रचाराची सांगता आहे. आता निवडणूक प्रचार सरतेशेवटी वाटलं होत कोणतरी सलाईन लावून घेईल परंतु अजून तरी काही कानावर आल नाही. कारण सहानुभूती ची लाट आता संपली आहे. अमिषे, पैसे, चपट्या, काळ्या पिशव्या येतील असं कोण आढळले तर त्यांना प्रसाद द्या. असे सांगत पाटणच्या सभेला जेवढी गर्दी आहे. तेवढी गर्दी तांबव्यातील मुख्यमंत्र्यांच्या सभेला नव्हती. परिवर्तनाची गरज लोकांना आहे. याबरोबर देखील प्रशासानाला जास्त गरज आहे. विरोधक महाशय सत्तेत आल्यानंतर लोकांची सेवा करायची सोडून त्रास द्यायचे काम करतात. आठ महिने शहराला सीईओ येत नाही. कित्येक वर्ष झाली शंभर कॉटचा दवाखाना काढत आहेत. कोविड मध्ये पाटणला अत्याधुनिक दालन उभे करण्या ऐवजी ते मरळीला पळवले. या काळात आम्ही सामाजिक कर्तव्य समजून प्रशासनाला पंचवीस व्हेटिंलेटर दिले.

महाराष्ट्र पाटण विधानसभा मतदारसंघात लक्ष ठेऊन आहे. परिवर्तन लोकांनी घडवायचे आहे. दहा वर्षात जास्त प्रसिद्धीला आलेला प्रकल्प म्हणजे मलिदा गँग प्रा. लि. कंपनी स्थापन केली आहे. विकास लोकांसाठी कि ठेकेदारांसाठी आहे. हे आता जनतेला समजले आहे. कोणत्याही स्मारकांची उभारणी करताना त्याचा फायदा सर्वसामान्य घटकांना झाला पाहिजे. स्म ारक उभे करताना नावासाठी नाही तर समाज उपयोगी ठरावं. दादांनी शिक्षणाचे जाळे तालुक्यात उभे केले आणि विरोधकांनी बेरोजगारी निर्माण करुन दारु दुकाने बार वाढवलीत आता मतदार संघात परिवर्तन करणे गरजेचे आहे. पुढिल पाच वर्ष मी जनतेसाठी तत्पर आहे. तालुक्याचे भवितव्य ठरवायचे असेल तर एकत्रित या संघटित व्हा. बहुमताने निवडून येण्यासाठी प्रयत्न करा.

यावेळी हिंदुराव पाटील, पी.डी. (आप्पा) नांगरे, परशुराम दाभाडे, विशाल निकम, संभाजीराव पाटणकर, संजय इंगवले, काळे मॅडम यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रारंभी मनोहर यादव यांनी प्रास्ताविक करुन शेवटी सर्वांचे आभार मानले.

# प्रचाराच्या तोफा थंडावल्या ! १२ मतदारसंघात चुरस || राजकीय नेत्यांचे दिवाळीनंतर आरोपांचे फटाके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१८, अहिल्यानगर :** अवघ्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचा रणसंग्राम सुरू आहे. शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी अजित पवार गट यांची महायुती विरुद्ध शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार आणि काँग्रेस यांची म हाविकास आघाडी यांच्यात प्रमुख सामना रंगला आहे. याशिवाय काही ठिकाणी वंचित बहुजन आघाडी, मनसे यांच्यामुळे लढत बहुरंगी झाली आहे.

त्याचप्रमाणे काही ठिकाणी अपक्ष आणि बंडखोरांचंही तगडं आव्हान आहे. दरम्यान, गेल्या १५ दिवसात दिवाळीनंतर राजकीय नेत्यांनी जिल्ह्याच्या रणसंग्रामात राजकीय फटाके फोडत विरोधकांवर तोफा डागल्या. या जाहीर प्रचाराची आज सायंकाळी सांगता होणार आहे. नगर राज्यातील विधानसभेचा प्रचार शिगेला पोहोचला असून विशेषतः यंदा माध्यम ांसह सोशल मीडियावर प्रचाराचा जोर दिसून आला. विधानसभेच्या प्रचाराच्या तोफा आज थंडावणार असून रविवारी जिल्ह्या प्रचाराचा सुपर संडे दिसून आला. यात पदयात्रा, कॉर्नरसभा व जेवणावळीला ऊत आल्याचे चित्र चोहीकडे होते. विधानसभेची विद्यमान सदस्य संख्या २८८ इतकी असून, सत्तास्थापनेसाठी १४५ हा बहुमताचा आकडा गाठणे गरजेचे आहे. यामुळे सर्वच पक्षाचे नेते आपल्या अन् मित्रपक्षाच्या जागा कशा वाढतील यासाठी रात्रंदिवस प्रचारात गुंग असल्याचे दिसत आहे. नगर जिल्ह्यात विधानसभेच्या १२ जागा असून याठिकाणी महायुती की महाविकास आघाडी सर्वाधिक जागा घेणार यावर राज्याचे सत्तेचे गणित अवलंबून राहणार आहे.

जिल्ह्यातील काही मतदारसंघात अपक्ष चमत्कार घडवणार असून काही ठिकाणी हे अपक्ष कोणाला दणका देत घराचा रस्ता दाखवणार हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. गेल्या १५ दिवसात नगर जिल्ह्यात महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांनी जोमाने प्रचार यंत्रणा राबवित जिल्ह्यातील प्रत्येक म तदारसंघातील गावन गाव,वाडी वस्ती, शेतकऱ्यांच्या बांधावर, शहरातील प्रत्येक गल्लीबोळ पिंजून काढत जाहीर सभेत आपणच कसे योग्य उमेदवार हे मतदारांना समजावून सांगत विरोधकांवर टीकेची झोड उठवताना दिसले. एकंदरीत, सर्वच पक्षांच्या नेत्यांना विजयासाठी जोरदार प्रयत्न केलेले असून यामुळे आता २०२४ च्या विधानसभा निवडणुकीकडे देशाचे लक्ष लागले आहे. बुधवारी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे. त्यानंतर २३ नोव्हेंबरला निवडणुकांचे निकाल घोषित होतील. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत कोणता पक्ष सत्तेत येणार, कोणाच्या पदरात मुख्यमंत्री पद पडणार, हे पाहण्यास सर्वजण उत्सुक आहेत. मुख्यमंत्री होण्यासाठी यात नगर जिल्ह्याचा किती वाटा राहणार हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. महाविकास आघाडी आणि म हायुतीमध्ये यंदा जोरदार लढत दिसत आहे. मागील पाच वर्षात पक्ष,पदांसह सत्ताही बदलली आणि अनेक मोठे राजकीय बदल घडामोडी दिसून आल्या. यामुळे आगामी निवडणुका पार पडल्यानंतर राजकीय चित्र कसे राहील ? याबाबत नाना प्रकारचे अंदाज लोक बांधू लागले आहे. दुसरीकडे निवडणूक यंत्रणा, जिल्हा प्रशासन मतदान घेण्यासाठी सज्ज झाली आहे. मतदानासाठी आवश्यक मनुष्यबळ, मतदान यंत्रणा, बंदोबस्त, विविध पथके, प्रम ुख शहरात सुरू असणारी नाकेबंदी यामाध्यमातून निष्पक्ष आणि भयमुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# थोडक्यात

## ठाण्यातील बालमित्र मंडळाचा अनोखा सामाजिक उपक्रम




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१८, ठाणे :** सेवाभावी संस्थाकडून समाजहिताचे वेगवेगळे उपक्रम राबविले जातात पण ठाण्यातील श्रीनगर येथील बाल मित्र मंडळाने अनोख्या स्वरुपाचा माणसुकीचा फ्रीज हा अनोखा सामाजिक उपक्रम सुरू केले असतात. अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आणि यातील भुकेने व्याकूळ गोरगरिबांची अन्नाची गरज या माध्यमातून भागविली जाणार आहे.आजही समाजातील कित्येक कुटुंबांच्या या मुलभूत गरजा भागल्या जात नाही. त्यांच्यासाठी हा सामाजिक उपक्रम वरदान ठरणार आहे. काहींना आजचं जेवताना उद्याच्या जेवणाची शाश्वती नसते, अश्यावेळी आजचे जास्तीचे उरलेले अन्न उद्यासाठी शिळेपाके खाण्यासाठी राखून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारचे अन्न या फ्रीजमध्ये ठेवले जाणार आहे.

सामाजिक दायित्वाच्या भावनेतून या उपक्रमाला अनेकांनी हातभार लावला आहे. फळे, बिस्किटे, पाणी व पोट भरेल असे अन्नपदार्थ या उपक्रमाला अनेकांनी देवु केलेले आहे. यामुळे जेवणासाठी धडपड करणाऱ्यांच्या मुखात सोन्याचा खास जाणार आहे. ज्यांच्या घरी अन्न उरते, त्यांनी ते अन्न कच-यात फेकून न देता व्यवस्थित पँक करून या फ्रीजमध्ये आणून ठेवायचे आहे.ज्यांना या अन्नाची गरज आहे. त्यांनी या फ्रीजमधून घेऊन जायचे आहे. लग्नकार्य, हॉटेल, समारंभ यामध्ये उरलेले अन्न लोक या माणुसकीच्या फ्रीजमध्ये आणून ठेवत आहेत. गरीब भुकेले लोक येथून कुटुंबासाठी अन्न घेऊन जात आहेत. ठाणेकरांनी आपल्याकडील उरलेले अन्न आणून या फ्रीजमध्ये ठेवावे असे आवाहन मंडळाचे पदाधिकारी करत आहेत.

## पुरुषोत्तम जाधव यांच्या प्रचारार्थ वाई व शिरवळ शहरात भव्य रॅली



**अक्षराज : धर्मेंद्र वर्पे**

**दि.१८, वाई (सातारा) :** अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यासाठी आपल्या लोकप्रतिनिधीला जर वेळच मिळत नसेल तर अशा निष्क्रिय आमदारांना छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेण्याचा देखील अधिकार नाही. नेहमीच प्रचारात छत्रपतींचा स्मारकाचा मुद्दा घेऊन तीन टर्म आमदारकी भोगली, आता २०२४ मध्ये पुन्हा तोच अर्धवट अवस्थेत असलेल्या स्मारकाचा मुद्दा

घेऊन वाई शहरात मते मागत आहेत.दोन गुंठ्यांत सुरू असलेल्या छत्रपतींच्या स्म ारकाला पूर्ण करण्यासाठी १५ वर्षे लागत असतील तर काय म्हणायचं या बिचाऱ्याला? असा सवाल अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांनी विद्यमान आमदारांना केला आहे. वाई व शिरवळ शहरात झालेल्या प्रचार रॅली दरम्यान ते बोलत होते.

वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांच्या प्रचारार्थ वाई व शिरवळ शहरातून जोरदार प्रचार रॅली काढण्यात आली यावेळी वाई शहरातील मतदार बंधू भगिनी नागरिक व व्यापाऱ्यांशी पुरुषोत्तम जाधव यांनी प्रत्यक्ष भेटून संवाद साधला.

**शिरवळ शहरात पुरुषोत्तम जाधव यांचे भगवे वादळ**

वाई खंडाळा महाबळेश्वर विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार पुरुषोत्तम जाधव यांची जोरदार प्रचार रॅली काल रात्री वाई शहरात काढण्यात आली या रॅलीम ध्ये हजारो युवकांचा सहभाग होता.कट्टर हिंदुत्ववादी विचाराची ओळख असलेल्या पुरुषोत्तम जाधव यांनी आज सकाळी शिरवळ शहरातून काढलेल्या या रॅलीमध्ये देखील मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग नोंदवला. या प्रचारा दरम्यान वाई आणि शिरवळ शहरात भगवे वादळ पाहायला मिळाले.

## तळोजात साडेपाच कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

**दि.१८, पनवेल :** तळोजा वसाहतीमध्ये नवी मुंबई पोलीसांनी दोन परदेशी नागरिकांकडून मेफेड्रोन, कोकेन असे साडेपाच कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहे. पोलीसांनी या प्रकरणी परदेशी नागरीक वास्तव्य करत असलेल्या घरमालकांवर सुद्धा कारवाई केल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांनी दिली. नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी पथकाची तळोजा हद्दीमध्ये कारवाई, ०२ नायजेरीयन आरोपींसह ५ कोटी ६२ लाख रूपयांचे मेफेड्रॉन व कोकेन हे अंमली पदार्थ जप्त, घरमालक देखील सह आरोपी. नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलींद भारंबे यांनी अंमली पदार्थ विक्रीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे पोलीस उपायुक्त अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई अंमली पदार्थ मुक्त करण्यासाठी पोलीस वेगवेगळे सापळे रचत आहेत. अंमलीपदार्थाचा व्यापार आणि सेवन करणाऱ्या व्यक्तींवर पोलीसांकडून सातत्याने कारवाई होत आहे.

शनिवारी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांना तळोजा येथे अंमलीपदार्थाचा साठा असल्याची माहिती मिळाली होती. तळोजातील धरणाकॅम्प या परिसरातील शिर्के बिल्डींग येथे पोलीसांनी सापळा रचल्यानंतर तेथे नायजेरीया देशातील व्यक्ती राहत असलेल्या घरामध्ये मेफेड्रॉन व कोकेन हे अंमल पदार्थ आढळले. घटनास्थळी सहाय्यक पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीकांत नायडू, निलेश धुमाळ व इतर पोलीस कर्मचा-यांनी २५ वर्षीय ओनयेका हिलरी इलोडिन्सो याच्याकडून ५ कोटी ६२ लाख ७० हजार रुपयांचे २ किलो ४२ ग्रॅम वजनाचे मेफेड्रॉन आणि १७४ ग्रॅम वजनाचे कोकेन हे अंमली पदार्थ ताब्यात घेतले. तसेच ४० वर्षीय चिडीबेरे ख्रिस्तोफर मुओघालु या संशयीताकडून पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपलेली असताना देखील राहत असताना पोलीसांना तेथे सापडला. पोलीसांनी या दोघांविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून या संशयीतांवर एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ (क), २१ (क), २२ (क) सह बी.एन.एस. कायदा २०२३ चे कलम २२१, २२४ सह परदेशी नागरीक कायदा १९४६ चे कलम १४ (क) व रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट १९३९ चे कलम ५ अन्वये गुन्हा नोंदविला आहे. संशयीतांना रविवारी दुपारी अटक करण्यात आली.